आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२ जानेवारी २०२५ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागाचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करण्यासाठी राज्य सरकारनं केलेल्या प्रयत्नांची प्रधानमंत्र्यांनी केली प्रशंसा
- महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यात आकारी पड जमिनीसंदर्भातल्या तरतुदीत सुधारणा करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
- सन २०२४ मधे देशात वाहन विक्रीत ९ टक्के वाढ

**आणि**

- नेमबाज मनु भाकर आणि बुद्धिबळपटू डी गुकेश यांच्यासह ४ खेळाडू यंदा खेलरत्न पुरस्काराचे मानकरी, स्वप्नील कुसाळेला अर्जुन पुरस्कार

<><><><><>

दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागाचा सर्वांगीण विकास सुनिश्चित करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने केलेल्या प्रयत्नांची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रशंसा केली आहे.  यामुळे या भागातल्या जीवन सुलभतेला चालना मिळेल, आणि प्रगतीचा मार्ग मोकळा होईल, असं त्यांनी समाजमाध्यमवरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. गडचिरोली इथं काल ११ नक्षली अतिरेक्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर आत्मसमर्पण केलं. या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री मोदी यांनी गडचिरोलीतल्या नागरिकांचं विशेष अभिनंदन केलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्र पोलीस दल आज आपला वर्धापन दिन साजरा करत आहे. १९६१ मधे तत्कालीन प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरु यांनी याच दिवशी महाराष्ट्र पोलीस

दलाला स्थापनादिनाचा ध्वज प्रदान केला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसंच इतर अनेक मंत्री, लोकप्रतिनिधी, राजकीय पक्ष तसंच सामाजिक कार्यकर्त्यांनी पोलीस दिनानिमित्त पोलिस दलातल्या अधिकारी कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यात आकारी पड जमिनीसंदर्भातल्या तरतुदीत सुधारणा करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाला. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर मंत्री उपस्थित होते.

शासकीय कर्मचाऱ्यांचं वेतन आणि भत्ते प्रदान करण्यासाठी मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेत वैयक्तिक खाते उघडायला, तसंच महामंडळ, सार्वजनिक उपक्रम यांच्याकडचा अतिरिक्त निधीची गुंतवणूक प्राधिकृत करालाही मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. प्रत्येक पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी युनिक आयडी तयार करण्याचा, तसंच सर्व समाज विकास महामंडळं एका आयटी प्लॅटफॉर्मवर आणण्याचा निर्णयही या बैठकीत झाला.

'ई ऑफिस'च्या धर्तीवर 'ई-कॅबिनेट'चं सूतोवाच या बैठकीत करण्यात आलं. राज्य मंत्रिमंडळाचा संपूर्ण मसुदा टॅबच्या माध्यमातून हाताळला जावा, यातून कागदाची बचत होऊन पर्यावरण जपले जाईल, ही त्यामागची भावना असल्याचं सांगण्यात आलं.

माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल या बैठकीत शोकप्रस्ताव मांडून, मंत्रिमंडळानं त्यांना आजदरांजली वाहिली. डॉ. मनमोहन सिंग यांचं कार्य देश कायम स्मरणात ठेवेल, अशी भावना मंत्रिमंडळानं व्यक्त केली.

**<><><><><>**

मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास बीड जिल्ह्याबाहेरच्या यंत्रणेकडे सोपवावा, अशी मागणी विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. या प्रकरणात पोलिसांच्या कामात राजकीय हस्तक्षेप दिसून येत असल्याची टीका त्यांनी केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्ली इथं विविध विकास कामांचं उद्घाटन आणि पायाभरणी करतील. जेजे क्लस्टर मधल्या रहिवाशांसाठी  बांधलेल्या सुमारे १७ शे फ्लॅट्स चं ते उद्घाटन करतील, तसंच नवी दिल्लीतल्या अशोक विहार इथल्या पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या घराची चावी सुपूर्द करतील. दिल्लीतल्या  दोन नागरी पुनर्विकास प्रकल्पांचं  ते  उद्घाटन करतील. द्वारका इथल्या सुमारे ३०० कोटी रुपये खर्चाच्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या एकात्मिक कार्यालय संकुलाचं उद्घाटनही ते करतील. दिल्ली विद्यापीठातल्या  ६०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या तीन नवीन प्रकल्पांची प्रधानमंत्री उद्या पायाभरणी करतील. यामध्ये नजफगढ इथल्या वीर सावरकर महाविद्यालयाच्या इमारतीचा समावेश असून, या ठिकाणी  अत्याधुनिक शिक्षण सुविधा उपलब्ध केल्या जातील.

<><><><>

ओएनडीसी, अर्थात डिजिटल व्यवहारांसाठीच्या खुल्या नेटवर्कमुळे लहान व्यवसाय सक्षम झाले असून, ई-कॉमर्समध्ये क्रांती झाल्याचं  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. विकास आणि समृद्धी पुढे नेण्यात ओएनडीसी महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं त्यांनी समाज माध्यमवरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

भारतात ई-कॉमर्सचं लोकशाहीकरण करण्याच्या उद्देशानं २०२१ साली केंद्रसरकारनं ओएनडीसी सुरु  केल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल यांनी म्हटलं आहे. विक्रेते आणि ग्राहक यांच्यातलं अंतर कमी करून, ओएनडीसी देशाच्या ई-कॉमर्स परिप्रेक्ष्यात क्रांती घडवत आहे, असं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><>

चाळीस वर्षांपूर्वी भोपाळ गॅस दुर्घटनेनंतर बंद असलेल्या युनियन कार्बाइड कारखान्यातून सुमारे ३७७ टन घातक कचरा विल्हेवाटीसाठी हलवण्यास कालपासून सुरुवात झाली. हा विषारी कचरा १२ सीलबंद कंटेनर ट्रकमधून इंदूर जवळच्या पिथमपूर औद्योगिक परिसरात हलवला जात आहे. धोकादायक कचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी विशेष रस्ता मोकळा करण्यात आला आहे.

१९८४ साली दोन आणि तीन डिसेंबरच्या मध्यरात्री युनियन कार्बाइड या कीटकनाशक निर्मिती कारखान्यातून अत्यंत विषारी मिथाइल आयसोसायनेट वायूची गळती झाली, त्यामुळे हजारो लोक मरण पावले आणि हजारो लोकांना गंभीर आणि दीर्घकाळ भेडसावणाऱ्या आरोग्य समस्यांना सामोरं जावं लागत आहे.

<><><><>

२०२४ या वर्षी देशात वाहन विक्रीत ९ टक्के वाढ झाली असून ती २ कोटी ६० लाखापर्यंत पोहोचली आहे. कोविड काळापूर्वीचा २०१८ मधला २ कोटी ४५ लाखाचा उच्चांक या वर्षात वाहनविक्रीने ओलांडला. वैयक्तिक उपभोगासाठी खर्च करण्य़ाची ऐपत वाढल्याचं हे निदर्शक आहे. पायाभूत सुविधा क्षेत्रावर अधिक लक्ष देण्याचं सरकारचं धोरण वाहन उद्योगाला प्रोत्साहन देणारं ठरेल असं मत उद्योगविषयक तज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे.

<><><><><>

गेल्या १० वर्षांमध्ये देशात रोजगार निर्मितीमध्ये ३६ टक्के इतकी लक्षणीय वाढ झाल्याचं कामगार आणि रोजगार मंत्रालयानं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. २०१४ ते २०२४ या काळात देशात १७ कोटींपेक्षा जास्त अतिरिक्त रोजगार निर्माण झाला, तर गेल्या वर्षभरात देशात ६० लाख रोजगार निर्माण झाल्याचं यात म्हटलं आहे. गेल्या १० वर्षांमध्ये कृषी क्षेत्रातल्या रोजगाराच्या संधींमध्ये १९ टक्के, उत्पादन क्षेत्रात १५ टक्के आणि सेवा क्षेत्रात ३६ टक्के वाढ झाल्याचं या आकडेवारीमधून स्पष्ट होत असल्याचं यात म्हटलं आहे.

<><><><><>

केंद्र सरकारच्या नवसाक्षरता कार्यक्रमाअंतर्गत अकोला जिल्ह्यात निरक्षर सर्वेक्षण मोहिम राबवण्यात येत आहे. शिक्षण विभागाच्या शिक्षक आणि अधिकाऱ्यांनी केलेल्या सर्वेक्षणात जिल्ह्यात जवळपास १५ हजारांवर निरक्षर आढळून आले आहेत. या निरक्षरांना बाराखडी, पाढे पाठ करण्यासोबतच लिहिण्या-वाचनाचे धडे दिले जाणार आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधल्या

शिफारशीनुसार २०३० पर्यंत १५ वर्षांवरच्या तरुण आणि प्रौढांना १०० टक्के साक्षर करण्यासाठी नवसाक्षरता कार्यक्रम राबवण्यात येत आहे.

<><><><>

यंदाचा खेल रत्न पुरस्कार ऑलिंपिकमधे दोन पदकं जिंकणारी नेमबाज मनु भाकर आणि विश्वविजेता बुद्धिबळ पटू डी गुकेश यांच्या सह ४ खेळाडूंना जाहीर झाला आहे. पॅरा ॲथलिट प्रवीणकुमार आणि हॉकीपटू हरमप्रित यांना ही खेल रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. महाराष्ट्राचा नेमबाज स्वप्निल कुसाळे याला अर्जुन पुरस्कार, तर नेमबाजी प्रशिक्षक दीपाली देशपांडे यांना द्रोणाचार्य पुरस्कार जाहीर झाला आहे.

क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ३२ खेळाडूंना अर्जुन पुरस्कार जाहीर झाले आहेत. पॅरा जलतरणपटू मुरलीकांत राजाराम पेटकर आणि ॲथलेटिक सुचा सिंह यांना जीवनगौरव अर्जुन पुरस्कार जाहीर झाला आहे.

केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयानं आज पुरस्कारविजेत्यांची नावं जाहीर केली. राष्ट्रपती भवनात १७ जानेवारीला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कार विजेत्यांना सन्मानित केलं जाईल.

<><><><>

नवी दिल्लीत प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या संचलन सोहळ्याची तयारी सुरु आहे. कर्तव्यपथावर संरक्षण दलाच्या सैनिकांकडून संचलनाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. दरम्यान, प्रजासत्ताक दिन संचलन आणि बीटिंग रिट्रीटसाठी तिकिटांची विक्री आजपासून सुरू झाली. आमंत्रण डॉट एम ओ डी

डॉट जीओव्ही डॉट इन या संकेतस्थळावरुन किंवा आमंत्रण ॲप वरुन थेट तिकिटं खरेदी करता येतील.

<><><><><>

धाराशिव जिल्ह्यात खरीप हंगाम 2023 मध्ये शेतकऱ्यांच्या नावावर  बनावट पीक विमा भरल्या प्रकरणाची सविस्तर माहिती जिल्हा पोलीस अधीक्षकांनी नव्यानं द्यावी, अथवा त्यांच्या विरोधात विधानसभेत हक्कभंग प्रस्ताव दाखल केला जाईल, असा इशारा भाजपाचे आमदार सुरेश धस यांनी एका निवेदना द्वारे दिला आहे. या प्रकरणी किती व्यक्तींविरोधात गुन्हे दाखल झाले, किती जणांना अटक झाली, अपहरणाची रक्कम किती, याविषयी सविस्तर माहिती द्यावी, असं यात म्हटलं आहे.